महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११००१.
Web:www.dhepune.gov.in E-mail : law.dhepune@nic.in
फोन नं. ०२०/२६०५१७२९,२६१२२११९,२६०५१५१२, फॅक्स नं.०२०/२६१११९५३

क्रमांक-उशिसं/विधी/प्र.क्र.१२-१८/सीईटीसेल/ ५८१६ दिनांक : 22 MAY 2018

**परिपत्रक -**

**विषय :शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये विधी ५ वर्षीय पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी महाविद्यालयांच्या नाव नोंदणीबाबत. . .**

संदर्भ : राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांचे वेळापत्रक दिनांक १७.०५.२०१८.

उपरोक्त विषयांकित प्रकरणी राज्यातील शासकीय/ अशासकीय अनुदानित/ अशासकीय अनुदानित अल्पसंख्यांक/ विद्यापीठ संचलित /विना अनुदानित/ कायम विना अनुदानित अल्पसंख्याक/ कायम विना अनुदानित तत्वावर सुरू असणाऱ्या महाविद्यालयातील/ विद्यापीठ विभागातील विधी ५ वर्षीय अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष सन २०१८-१९ करिताच्या प्रवेशासाठीची केंद्रीभूत प्रक्रिया राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांचेद्वारे लवकरच सुरु करण्यात येत आहे.

**अ)** केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया सन २०१८-१९ मध्ये सहभागी होण्यासाठी महाविद्यालयांनी http://www.mah-llb5admission.in/ या संकेतस्थळावर ऑनलाईन नाव नोंदणी करावी. **केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभाग घेवू इच्छिणाऱ्या विधी महाविद्यालयांनी आवश्यक माहिती अचूकपणे दिनांक २१.०५.२०१८ ते दिनांक २८.०५.२०१८ या कालावधीमध्ये उपरोक्त संकेतस्थळावर भरणे आवश्यक आहे.**

**ब)** उपरोक्त नमूद संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर केलेनंतर त्यासोबत खालीलप्रमाणे नमूद सहपत्रे / मान्यता पत्रे जोडण्यात यावीत.

१. नाव नोंदणी करणाऱ्या महाविद्यालयांनी महाविद्यालय सुरु करण्यास असलेली शासन मान्यता तसेच महाविद्यालयामध्ये एकापेक्षा जास्त तुकडी असतील तर सदरहू अतिरिक्त तुकडी सुरु करणेसाठी असलेली शासन मान्यतेची प्रत प्रस्तावासोबत जोडण्यात यावी.
२. सन २०१८-१९ करिता संबंधित विद्यापीठाचे संलग्निकरण असल्याचे पत्र सोबत जोडणे आवश्यक आहे. ( संलग्निकरण पत्र उपलब्ध नसल्यास पृ.क्र. २ वर दिल्याप्रमाणे विद्यापीठाचे प्रमाणपत्र जोडण्यात यावे.)

( कृ. मा. प. )

३. अल्पसंख्याक महाविद्यालयाने ५० टक्के अल्पसंख्यांक कोटा किंवा कोटयाच्या काही जागा केंद्रिय प्रवेश प्रक्रियेला समर्पित करणार असेल तर त्याबाबतचा प्रस्ताव या संचालनालयास सादर करावा व प्रत आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, अली यावर जंग मार्ग, बांद्रा, मुंबई - ५१ यांना देण्यात यावी.

४. केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभागी होवू इच्छिणारे विना अनुदानित व कायम विना अनुदानित महाविद्यालयांनी प्रति तुकडी रु. १५००/- एवढी रक्कम ऑनलाईन पध्दतीने भरणे आवश्यक आहे.

५. ऑनलाईन अर्जामध्ये मोबाईल क्रमांक व ई-मेल आय डी हा अचूकपणे नमूद करण्यात यावा, यापूढे सर्व माहिती व सुचना या आपण अर्जामध्ये नमूद केलेल्या ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांकावरच आपणास कळविण्यात येतील.

**क) आपणास विदित आहे की, विधी ५ वर्षीय अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया ही ऑनलाईन पध्दतीने राबविली जात आहे. या प्रक्रियेत विद्यार्थ्यांकडून पहिल्या तीन प्रवेश फेऱ्यांसाठ एकदाच विकल्प (Option Form) अर्ज भरले जातात. त्यामुळे प्रक्रियेत सुरुवातीला ज्या महाविद्यालयांची नोंदणी ऑनलाईन होईल तीच महाविद्यालये विकल्प (Option) देण्यासाठी विद्यार्थ्यांना उपलब्ध होतील. सबब, विहित मुदतीमध्ये म्हणजेच दि. २८.०५.२०१८ पुर्वीच महाविद्यालयाची ऑनलाईन नोंदणी होणे अत्यावश्यक आहे, याची नोंद घ्यावी.**

**ड)** ज्या महाविद्यालयांना शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठी विद्यापीठाचे संलग्निकरण प्राप्त झालेले नाही, त्यांनी विद्यापीठाच्या सक्षम अधिकाऱ्यांचे खालील आशयाचे प्रमाणपत्र प्रस्तावासोबत सादर करावे. ( विद्यापीठाचे सन २०१८-१९ करिता संलग्निकरण पत्र अथवा सोबतचे प्रमाणपत्र सोबत नसल्यास आपल्या महाविद्यालयाचे नाव केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभागी करण्यात येणार नाही याची नोंद घेण्यात यावी.)

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, .................................................................................... या महाविद्यालयाला शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठी संलग्निकरण देण्याची बाब विद्यापीठाच्या विचाराधीन आहे. या महाविद्यालयात .......... मान्य तुकडया असून प्रवेश क्षमता .......... एवढी आहे. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठी सदरहू महाविद्यालयातील बी.एड./ एम.एड./ बी.पी.एड./एम.पी.एड/ विधी ३ वर्ष/ विधी ५वर्ष अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाकरिता एकूण ........... विद्यार्थी केंद्रीय प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेशित करण्यासाठी विद्यापीठाची शिफारस आहे.

( ...३/-)

**इ)** विधी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया शासन अधिसूचना उच्च व तंत्रशिक्षण विभाग, दिनांक ०५ मे, २०१७ व शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्र. सीईटी-२०१७/प्र.क्र.१२४/मशि-२, दि. १२.०५.२०१७ अन्वये राबविण्यात येईल.

http://www.mah-llb5admission.in/ या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर केलेनंतर अर्जाची साक्षांकित प्रत व त्यासोबतची आवश्यक सहपत्रे / मान्यता पत्रे जोडून ती या संचालनालयास **दि. ३०.०५.२०१८** पर्यंत पोहोचेल अशा पध्दतीने पाठविण्यात यावीत. शक्यतो सदरहू सहपत्रे खास दूताकरवी संचालनालयास हस्तपोच करण्यात यावीत. विहीत मुदतीमध्ये आपला प्रस्ताव संचालनालयास प्राप्त न झाल्यामुळे आपल्या महाविद्यालयाचा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये समावेश न झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांची राहील याची नोंद घ्यावी.

**( डॉ. धनराज माने )**
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

प्रत -

१. प्राचार्य, विधी महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य.
२. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांना माहिती तथा उचित कार्यवाहीसाठी.
३. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.
   २/- आपल्या विद्यापीठ क्षेत्रातील सर्व विधी ५ वर्षीय अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांना सदर परिपत्रक निर्गमित करावे.
४. सांख्यिकी अधिकारी, प्रस्तुत कार्यालय
   २/- सदर परिपत्रक संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याबाबत योग्य कार्यवाही करावी
५. श्री. सुभाष खवणे, कल्प टेक्नॉलॉजी प्रा. लि., पुणे.
   २/- सदरचे परिपत्रक केंद्रीय प्रवेश प्रक्रियेच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करुन त्यानुषंगाने पुढील कार्यवाही करावी.

प्रत माहितीस्तव सविनय सादर -

१. मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ३२ यांना माहितीस्तव सविनय सादर
२. मा.आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, ३०५ शासकीय तंत्रनिकेतन, अली यावर जंग मार्ग, बांद्रा (पूर्व) मुंबई ४०० ०५१.